पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर, बोईसर, रोड,
कोळगांव (प.) जिल्हा – पालघर. दुरध्वनी – ०२५२५-२५११००
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in

जा.क्र.पोअपा/आस्था-१/पोशि ते सफौ/अंतिम/सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द/ ७२ /२०२५ दिनांक :- ०६/०१/२०२५

संदर्भ :- या कार्यालयाकडील क्र. पोअपा/आस्था-१/तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी/ पोशि ते सहा. फौज./१८/ २०२५, दि. १४/०१/२०२५

विषय :- पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक या संवर्गातील अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

---ooo---

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई/पोलीस नाईक/पोलीस हवालदार/ सहाय्यक पोलीस उप निरीक्षक या सवर्गातील सन-२०२५ ची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादया महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब जुन २२, २०२१/आषाढ १. शके १९४३, दि.२१/०६/२०२१ नुसार प्रत्येक्ष नियुक्ती दिनांक तसेच पदोन्नती ज्येष्ठतेचा दिनांकानुसार तयार करुन, पोलीस अधीक्षक, पालघर वेबसाईट www. palgharpolice. gov. in या संकेत स्थळावर उपरोक्त संदर्भान्वये दि.१४/०१/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत आलेल्या होत्या. सदर सेवाज्येष्ठता यादया वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन पोलीस स्टेशनच्या नोटीस बोर्डावर लावुन सर्व अंमलदारांच्या निदर्शनास आणुन देणेबाबत सर्व पोलीस अंमलदारांना हजेरीवर ०५ दिवस वाचुन दाखविणेबाबत कळविण्यांत आलेले होते. तसेच सदर सेवाज्येष्ठता यादीमध्ये नियुक्ती मार्ग/जन्म तारीख/ प्रवर्ग/प्रत्येक्ष रुजू दिनांक/पदोन्नती सेवाज्येष्ठता/सेवानिवृत्तीचा दिनांक /शैक्षिणक अर्हता इत्यादी बाबत कुणाचे काही आक्षेप असल्यास ते दि.२५/०१/२०२५ रोजी पावेतो पाठविणेबाबत सर्व विभागीय पोलीस उप अधिकारी/प्रभारी अधिकारी, पो. स्टे./सर्व शाखा/रापोनि, पोलीस मुख्यालय पालघर यांचे मार्फतीने सर्व संबंधीत पोलीस अंमलदार यांना कळविण्यांत आलेले होते. त्यानुसार पालघर जिल्हा पोलीस दलातील ०१ पोलीस अंमलदार यांनी त्यांचे आक्षेप नोंदविलेले होते. सरदहू नोदविण्यांत आलेल्या आक्षेपाची छानणी करुन त्याप्रमाणे संबंधीत पोलीस अंमलदार यांचे नावासमोर सेवाज्येष्ठता यादीमध्ये दुरुस्ती करण्यांत येवुन, सुधारीत अंतिम सेवाज्येष्ठता यादी पोलीस अधीक्षक, पालघर वेबसाईट www. palgharpolice. gov. in या संकेत स्थळावर पालघर जिल्हा पोलीस घटकातील सर्व पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांना माहितीकरीता प्रसिध्द करण्यांत येत आहे. तरी सर्व संबंधित पोलीस अंमलदार यांनी त्याबाबतची नोंद घ्यावी.

(बाळासाहेब पाटील)
पोलीस अधीक्षक, पालघर

प्रति,
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा पालघर
सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/ शाखा, जिल्हा पालघर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय पालघर

प्रत योग्य त्या कार्यवाही करीता
प्रभारी अधिकारी, सायबर सेल पालघर

२/- सदर सेवाज्येष्ठता यादया सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी/प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी/रापोनि, पोलीस मुख्यालय पालघर तसेच सर्व पोलीस अंमलदारांचे ई-मेल आयडीवर प्रसिध्द करण्यांत याव्यात.